**Indian Streams Research Journal**
**Vol -2 , ISSUE –9, October - 2012**
**ISSN:-** 2230-7850 Available online at www.lbp.world

# महात्मा फुले यांचे स्त्री उद्धाराचे कार्य

**प्रा. बोडखे संजीव सुखलाल**
**इतिहास विभाग , शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद, ता.खंडाळा जि.सातारा.**

## प्रास्ताविक

19व्या शतकात सर्वत्र अज्ञान, अनाचार, विषमता, धर्मरूढी यांचे साम्राज्य पसरले होते. समाजात भीषण अज्ञान, कर्मकांड, वर्णभेद, जातिभेद, बालविवाह, केशवपन, सतीची चाल इत्यादी रूढी प्रथांनी महाराष्ट्रासह संपूर्ण देश ग्रासलेला होता. यामुळे सामाजिक परिस्थिती खूपच खालावलेली होती. समाजातील स्त्रीयांना अजिबात स्थान नव्हते. त्यांचे स्वंतत्र अधिकार नाकारण्यात आलेले होते. स्त्री ही अबला, परावलंबी व पुरूष सुखाचे साधन असून पिता, पती किंवा बंधू यांच्या आश्रयाशिवाय जगूच शकत नाही. अशी ठाम शिकवण तत्कालीन सनातनी पंडित व भटभिक्षूकांची समजूत होती. मनूस्मृतीने स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्त्व नाकारले होते. त्यांनी स्त्रीयांच्या उद्धारासाठी स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह, केशवपन इ.बाबत महत्त्वाचे कार्य केले. तेव्हा महात्मा फुले यांनी स्त्रीयांच्या स्थितीत सुधारणा व्हावी या हेतूने जे कार्य हाती घेतले होते त्याची सविस्तर माहिती या निबंधामध्ये दिलेली आहे.

## महात्मा फुले यांच्यापुर्वीची स्त्रीयांची अवस्था

19व्या शतकातील समाज हा धार्मिक कर्मकांडानी सर्व ब्राह्मणेत्तर समाज रसातळाला गेला होता. लोकहितवादीनी आपल्या शतपत्रात गुलामगिरीतील स्त्रीजीवन व विशेषतः विधवांची विदारक अवस्था पाहून असे नमूद केले आहे की, ‘मला वाटते की, असे निर्दय, मूर्ख आणि आंधळे लोक या चारी खंड पृथ्वीवर नसतील आणि कोणत्यातरी शास्त्रावरून असा जुलूम दुनियेत झाला नसेल. हे सर्व शास्त्री, जुने लोक मेले म्हणजे बरे होईल.’[1] यावरून स्त्रीयांची दयनीय स्थिती समजते. सामाजिक चालीरीती व रूढीपरंपरेत बालविवाह, केशवपन व सतीची चाल अशी अनेक बंधने स्त्रियावर लादलेली होती. या काळात स्त्रीजन्मच अशुभ मानला होता. स्त्रियाही प्रदीर्घ काळ होत असलेल्या अन्यायामुळे आपले सत्व व स्वत्वच गमावून बसल्या होत्या. गुलाम म्हणून आश्रितासारखे व परावलंबी जीवन जगणे त्यांच्या आंगवळणी पडून गेले होते. गुलामगिरीची ही परंपरा मनूपासून सुरू होऊन ती आजपर्यत टिकून होती.[2]

पेशवेकाळात स्त्रियांच्या बाबतीत अशाच वाईट गोष्टी घडल्या. त्या दुराचाऱ्याच्या भितीमुळे अनेक महिला विहीरीत उडया टाकून स्वतःचा जीव घालवत असत. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात तर स्त्रियांची फारच दयनीय अवस्था झालेली होती.[3]

## स्त्री उद्धाराचे कार्य

### 1) स्त्रीशिक्षण

अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रखर सूर्यप्रकाश. हा प्रकाश अज्ञानाधंकार नष्ट करून मनुष्याचे जीवन चैतन्यमय करून सोडतो. जीवित पूर्णपणे विकसित करण्याचे आणि जगण्याचे, शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे. कोणत्याही समाजात द्रुतगतीने स्थित्यंतर घडवून आणण्यापूर्वी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यावश्यक असते, ती मुलभूत अशी एक आवश्यकताच असते. शिक्षणाने मनुष्याला सत्याअसत्याचा नि अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती प्राप्त होते. स्वाभिमानाची जाणीव त्याच्यात जागृत होते. म्हणून शिक्षण हे सर्व

सुधारणेचे मूळ आहे. म्हणूनच महात्मा फुले यांनी स्त्रियांना ज्ञानाचे दरवाजे खुले करावयाचे असा निर्धार केला.[4]

भारतीय समाजाने स्त्रियांना सामाजिक समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या दृष्टीने भ्रष्टाचार करणे होय. मुलीने शिक्षण घेतले तर अकाली वैधव्य येते, स्त्रीने शिक्षण घेतले तर ती वाईट मार्गास लागेल आणि घरच्या सुखाचे वाटोळे करील. जोतीबांना वाटत होते की, शिक्षणाने मनुष्याचे जीवन विकसित होते. याशिवाय स्वाभिमान जागृत करण्यासाठी शिक्षण गरजेचे आहे. शिक्षणामुळे अज्ञान दूर होऊन समाजात सर्व सुधारणा होण्यास मदत होते. म्हणूनच स्त्रीयांच्यात शिक्षणाचा प्रसार केला. मनुष्याच्या जीवनात शिक्षणामुळे चैतन्य निर्माण होऊन जीवन पूर्णपणे विकसित करण्याचे आणि जगण्याचे साधन मिळते. शिक्षणाने मनुष्याला सत्याअसत्याचा नि अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती केवळ शिक्षणाने प्राप्त होते. स्वाभिमानाची जाणीव जागृत करण्याचे शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणेचे मूळ आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धरी' या सत्याचा प्रत्यय जोतीबांना आला होता. म्हणूनच स्त्रीयांना शिक्षण देण्याचे ठरविले.[5]

पुण्यात इ.स.1848 मध्ये मुलींच्यासाठी एक शाळा सुरू केली. तेथे अस्पृश्य समाजातील स्त्रीयांना शिक्षण दिले जात होते. त्या शाळेत जोतीबा स्वतः शिक्षकाचे काम करीत असत. तर स्त्री शिक्षिका म्हणून आपली पत्नी सावित्रीबाईना तयार केले. त्यामुळे सनातनी लोकांनी या पती पत्नीला खूपच त्रास दिला. तरीही जोतीबांनी न डगमगता आपले कार्य नेटाने चालू ठेवले होते. ही मुलींची शाळा बंद पडली तेव्हा जोतीबांनी 3 जुलै 1851 रोजी बुधवार पेठेतील चिपळूणकरांच्या वाडयात दुसरी मुलींची शाळा काढली. अण्णासाहेब चिपळूणकर हे एक धनाढय गृहस्थ असून केशवराव भवाळकरांचे मित्र होते. केशवराव भवाळकर हे महात्मा फुले यांच्य शिक्षणकार्यात फार मोठया उत्साहाने भाग घेत असत. या सर्वांना हया कार्यात फार मोठा विरोध झाला. त्या वेळचे शिक्षणमंडळाचे अध्यक्ष जॉन वॉर्डन यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, 'ती शाळा लोकांच्या नजरेआड चालवण्यात येत असे.'[6] याच वर्षी रास्ता पेठेत 17 स्प्टेबर 1851 रोजी मुलींची तिसरी शाळा काढली आणि 15 मार्च 1852 रोजी वेताळपेठेत मुलींची चौथी शाळा सुरू केली. त्यांनी काढलेल्या या शाळेस सरकारचेही सहकार्य मिळाले.[7]

दादोबा पांडुरंग तर्खडकर हे त्या काळी सरकारी देशी शाळांचे पर्यवेक्षक होते. त्यांनी पहिल्या शाळेची परीक्षा 16 ऑक्टोबर 1851 रोजी बुधवारपेठेत घेतली. इतक्या थोडया वेळेत शाळेने चांगली प्रगती केली, हे त्या चालकांना भुषणावह आहे. असा त्यांनी अभिप्राय व्यक्त केला. पुणे महाविद्यालयाचे पर्यवेक्षक मेजर कँडी यांनी आपल्या वृत्तांतात म्हटले आहे की, 'शाळेतील मुलींची बुद्धीमत्ता आणि प्रगती पाहून मला फार समाधान झाले.'[8]

कनिष्ठ जातीच्या मुलींच्या शिक्षणासाठी मुलींच्या शाळा स्थापन करण्यात महात्मा फुले यांनी जी मोठी कळवळ दाखविली त्याप्रित्यार्थ त्यांना सरकारी शिक्षा मंडळीने महावस्त्र दिले. दि.16 मार्च 1852 रोजी पुणे येथे मोठा समारंभ होऊन त्यामध्ये मेजर कँडी यांनी सरकार बोर्ड ऑफ एज्युकेशन यांच्या मार्फत एक शालजोडी बक्षीस दिली.[9]

## 2) विधवा पुनर्विवाह

एखाद्या तरूण पुरूषाची पत्नी मरण पावल्यास किंवा ती जिंवत असतानासुद्धा एकाहून अधिक बायका करण्याची पुरूषांना पूर्ण मोकळीक होती. परंतु बालविधवेला मात्र पुनर्विवाह करता येत नव्हता. भूदेवाने धर्माची बंधने लादून तिने कायमचे नरकवासात राहावे अशी योजना केली होती. त्यासाठी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी विधवा पुनर्विवाह घडवून आणणारी सभा स्थापन केली. ही सभा 15 दिवसांनी एकदा भरत असे. यामध्ये हळदी कुंकू समारंभ, रसपान समारंभ, प्रौढ स्त्रियांचे शिक्षण आणि स्त्रियांचा होणारा छळ या विषयावर चर्चा होत असे आणि त्यावर उपाय सुचविले जात असत. हे उपाय सांघिक रित्या अमलात आणण्याचा प्रयत्न केला जाई.

बालविवाह, जरठ कुमार विवाह यांच्या प्रथा समाजात मोठया प्रमाणात होत्या. त्यामुळे विधवांची स्थिती अत्यंत बिकट झाली होती. समाजात विधवांना केशवपन करून विद्रुप केले जात होते. जर एखाद्या

विधवा स्त्रीकडून कुकर्म घडले तर तिला समाज कठोर शासन समाज करीत असे. या सर्व परिस्थितीमुळे स्त्रीयांची अवस्था फार बिकट झाली होती. जोतीबांनी समाजातील विधवा स्त्रीवर होणारे अन्याय रोखण्यासाठी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. इ.स.1864 मध्ये पुण्यातील गोखले यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला. ही योजना समाजाला मान्य होणारी नव्हती.[10]

### 3) बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना

देवाधर्माच्या नावाखाली अनेक मुली बालविधवा होत असत. कधी कधी आडमार्गाला लागून अत्याचाराच्या खाईत त्या सापडत यामुळे अशा बालविधवा एक तर गर्भपात करीत किंवा जन्मास आलेल्या अर्भकास ठार करत असत. जोतिराव आणि सावित्रीबाई यांनी यावर विचार केला त्यांनी बालहत्याप्रतिबंधक गृहाची 28 जाने. 1863 रोजी स्थापना केली. हे गृह त्यांनी आपल्या घराशेजारीच उस्मान शेख यांचे जागेत चालू केले. ‘कोणा विधवेचे अज्ञानपणाने वाकडे पाऊल पडून ती गरोदर राहीली तर तिने त्या गृहात गुपचूपपणे जाऊन बाळंत होऊन जावे.’ हे त्यांनी जाहीर केले. पुण्यात ही बातमी वाऱ्यासारखी पासरली. पुढे चार वर्षात या गृहात जवळजवळ 100 विधवांचे बाळंतपण झाले. यासाठी लोकहितवादी देशमुख, रावबहाद्दूर गोवंडे, श्री.भांडारकर, श्री नवरंगे, न्यायमूर्ती रानडे यांनी फार मोठे सहकार्य केले. महाराष्ट्रातील हेच पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह होय. या गृहाची सर्व व्यवस्था सावित्रीबाईच्याकडे होती. त्या या सर्व विधवांची काळजी घेत असत. यातील काशीबाई नावाच्या विधवेचा मुलगा यशवंत हा जोतीबांनी दत्तक घेतला.तो ब्राह्मण जातीतील होता. तो मुलगा पुढे डॉक्टर झाला. त्याचा विवाह हडपसर येथील ग्यानबा कृष्णराव ससाणे यांची मुलगी राधाबाईशी झाला. हा महाराष्ट्रातील पहिला मिश्र विवाह होय. त्यास सनातन्याकडून विरोध होत असतानाही तो उत्तम रितीने पार पाडला. अशाप्रकारे स्त्रीयांसाठी जोतीबांनी केलेले कार्य समाजक्रांती घडवून आणणारे होते.[11]

### निष्कर्ष

19व्या शतकात समाजात स्त्रियांवर वेगवेगळया रूढीद्वारे अन्याय होत होते. त्यांच्यावरील अत्याचार कमी व्हावेत या हेतूने त्यांनी स्त्रियांच्या उद्धाराचे काम हाती घेतले. त्यांनी स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह यास प्रोत्साहन दिले. अबलांची स्थिती ओळखून त्यांनी सन 1863 मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले. महात्मा फुले यांनी अस्पृश्य मुलींसाठी पहिली शाळा काढून स्त्रीशिक्षणास सुरूवात केल्याने त्यांना स्त्रीशिक्षणाचा जनक मानले जाते. भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य यांचा उद्गाता, शेतकरी व कामगार यांची दुःखे व दारिद्रय निवारण्यासाठी चळवळ उभारणारा पहिला पुढारी, जातिभेद संस्थेवर कडाडून हल्ला चढवून मानवी समानतेची घोषणा करणारा पहिला लोकनेता मानले जाते. महात्मा फुले यांना सामाजिक समतेच्या क्रांतीचे आद्यजनक व स्त्रियांचा उद्धारकर्ता असे म्हटले जाते. स्त्रियांसाठी जोतिबा फुले यांनी केलेले कार्य सामाजिक जीवनातील एक युगप्रवर्तक असेच ठरले आहे. महात्मा फुले यांना ‘महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर’ असे म्हणतात कारण ते प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाऊन चिंतनशीलपणे त्यावर ते विचार करीत असत.

### संदर्भ

1) डॉ.सहस्त्रबुद्धे पु.ग.(संपा.), लोकहितवादींची शतपत्रे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ.25
2) डॉ.माळी मा.गो., क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मॅजेस्ट्रिक प्रकाशन, मुंबई, जून 1997, पृ.27
3) टिकेकर श्री.रा.(संपा.), लोकहितवादींची शतपत्रे, पृ.10
4) भिडे जी.एल.व पाटील एन.डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, 2003, पृ.73
5) किर धनंजय, महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक,1968, पृ.27
6) ज्ञानोदय, 15 जुलै 1853
7) किर धनंजय, महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक,1968, पृ.274
8) G.D.Vol.VII, 1852, P.203
9) ज्ञानप्रकाश 22 नोव्हेंबर 1852

10) डॉ.माळी मा.गो., क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, जून 1997, पृ.96
11) कित्ता, 94, 95